महाराष्ट्र शासन
महसूल विभाग
जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी कार्यालय सातारा
Collector & District Magistrate Office Satara
पोवई नाका, एल. आय. सी. बिल्डींग समोर कोरेगाव रोड सातारा
दुरध्वनी क्रमांक ०२१६२-२३६१३३ फॅक्स क्रमांक :- ०२६२-२३०३१० email :- rdcsatara@gmail.com

| आदेश क्र./मह-२/आस्था-०४/शिपदो/कावि/१०९२(२)/२०२१ | दिनांक :- ०१ /१०/२०२१ |
|---|---|

वाचा -

१) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.बीसीसी/२००१/१८८७ /प्र.क्र.६४/०१/१६ब, दिनांक २६/१०/२००४.

२) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.संकीर्ण२०१५/प्र.क्र.५७/२०१५/ विसु-१, दिनांक १४/०१/२०१६.

३) महाराष्ट्र शासन राजपत्र अधिसूचना दिनांक ०६/०६/२०१७ अन्वये प्रसिध्द "लिपीक-टंकलेखक" गट क (सेवाप्रवेश) नियम २०१७.

४) महाराष्ट्र शासन राजपत्र अधिसूचना दिनांक ११/०६/२०१९ अन्वये प्रसिध्द "लिपीक-टंकलेखक" गट क (सेवाप्रवेश)(सुधारणा) नियम २०१९.

५) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१५/ प्र.क्र.३१० /कार्या.१२ दिनांक १५/१२/२०१७ व दिनांक ३०/०८/२०१८.

६) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक.एसआरव्ही-२०१८/ प्र.क्र.१५९/कार्यासन १२, दिनांक ०१/०८/२०१९.

७) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१६/प्र.क्र.२८३/ ई-७, दिनांक २०/०८/२०२०.

८) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक:बीसीसी-१८ प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ०७/०५/२०२१.

९) मा. जिल्हाधिकारी सातारा यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २९/०९/२०२१ रोजी झालेल्या पदोन्नत्ती निवड समितीच्या सभेचा इतिवृत्तांत.

जिल्हाधिकारी सत्यमेव जयते जिल्हा सातारा

---

## आदेश

'लिपीक-टंकलेखक' गट क (सेवाप्रवेश) नियम २०१७, दिनांक ०६/०६/२०१७ व 'लिपीक-टंकलेखक' गट क (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम २०१९, दिनांक ११/०६/२०१९ व सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.बीसीसी-१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ०७/०५/२०२१ तसेच उक्त पदोन्नती विषयक निर्देश / मार्गदर्शक तरतूदीनुसार खालील चतुर्थश्रेणी गट-ड संवर्गातील कर्मचारी यांना गट-क महसूल सहाय्यक संवर्गात तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देणेत येऊन त्यांचे वर्ग व नेमणुका शासनाचे सोईनुसार व प्रशासकीय कामकाजाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे करणेत येत आहेत.

| क्र. | शिपाई कर्मचा-याचे नाव | सद्य पद व कार्यालय | नवीन नियुक्तीचे पद व कार्यालय |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्री.आदेश जालींदर गुळुंमकर | पहारेकरी, उपविभागीय अधिकारी कार्यालय वाई सध्या तहसिल कार्यालय वाई | महसूल सहायक, तहसिल कार्यालय, महाबळेश्वर. |

वरील कर्मचाऱ्यांना देणेत आलेली सदरची पदोन्नती खालील अटीस व शर्तीस अधीन राहून देणेत येत आहे.

**अटी व शर्ती :-**

१) सदर आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करणेत यावी.

२) उपरोक्त पदोन्नती ही मा. सर्वोच्च न्यायालयातील विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात देण्यात येत आहे. सदर आदेशाने पदोन्नतीचे आदेश बाधीत झाल्यास, या आदेशान्वये पदोन्नत झालेल्या कर्मचाऱ्यांना सेवाजेष्ठता व तद्अनुषंगिक आर्थिक लाभ मागण्याचा हक्क राहणार नाही.

३) उक्त कर्मचाऱ्यांना देणेत आलेली सदरची पदोन्नती ही केवळ तात्पुरत्या स्वरुपात असून ज्यावेळी शासनास त्यांच्या महसूल सहायक सेवेची आवश्यकता नसल्यास त्यावेळी त्यांना मूळ पदावर पदावनत करणेत येईल.

४) गट क - महसूल सहायक या संवर्गातील सर्व सेवा शर्ती संबंधितांना बंधनकारक राहतील.

५) या कार्यालयाचे कार्यक्षेत्रात कोणत्याही कार्यालयात त्यांची बदली करणेत येईल.

६) या नेमणूकीच्या आदेशापासून एकूण तीन संधीमध्ये विभागीय दुय्यम सेवा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

७) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रं.प्रशिक्षण-२००२/प्र.क्र.६१/२००१/३९ दिनांक १९/०३/२००३ अन्वये, गट क (महसूल सहायक) संवर्गात नियुक्तीचे दिनांकापासून २ वर्षाचे आत प्रचलित तरतूदीनुसार संगणक अर्हता धारण करीत असलेबाबतचे मान्यताप्राप्त संस्थेचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. सदर कालावधीत त्यांनी प्रमाणपत्र सादर न केलेस दिलेली पदोन्नती आपोआप संपुष्टात येईल.

८) उपरोक्त गट-ड मधील कर्मचाऱ्यांनी पदोन्नतीच्या पदावरील त्यांच्या वेतन निश्चितीचा विकल्प पदोन्नतीच्या पदावर हजर झालेल्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत द्यावा. अशा प्रकारचा विकल्प न दिल्यास वेतननिश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील नियम ११(१) (ए) खालील तरतुदींनुसार पदोन्नतीचा दिनांक विचारात घेऊन केली जाईल.

९) सातव्या वेतन आयोगानुसार महसूल सहायक (गट क) या पदावर वेतन मॅट्रीक्स मधील वेतन स्तर एस-६ (S-६ : १९९००-६३२००) या वेतनस्तरात पदोन्नती देण्यात येत आहे.

१०) संबंधित पदोन्नत महसूल सहायक यांची ज्येष्ठता त्यांचे पदोन्नतीच्या पदावर रुजू झाल्याच्या तारखेपासून ग्राह्य धरण्यात येईल.

११) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही/२०१५/प्र.क्र.३०३/का-१२, दिनांक १२/०९/२०१६ अन्वये वरच्या संवर्गात पदोन्नतीसाठी निवड झाल्यानंतर पदोन्नती नाकारणा-या कर्मचा-यांचे नांव निवड यादीतून काढुन टाकण्यात येईल व पुढील २ वर्षांत होणा-या निवडसूचीमध्ये संबंधित कर्मचा-याचे नावाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच त्यांना यापूर्वी आश्वासित प्रगती योजने अंतर्गत लाभ दिले असल्यास, सदर लाभ काढुन घेण्यात येतील.

१२) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक.वशिअ-१२१४/प्र.क्र.२६/११, दिनांक ०२/०६/२०१४ अन्वये मत्ता व दायित्व याची वार्षिक विवरणपत्रे सादर करणे अनिवार्य असल्याने, संबंधित कार्यालय प्रमुखाने सदर विवरणपत्र कर्मचारी रुजू होताच प्राप्त करुन घ्यावे.

१३) संबंधित नियंत्रक अधिकाऱ्यांनी वरील कर्मचाऱ्यांना तात्काळ कार्यमुक्त करावे. तसेच पदोन्नती झालेल्या कर्मचाऱ्यांनी तात्काळ कार्यमुक्त व्हावे व पदोन्नतीच्या ठिकाणी तात्काळ कार्यभार स्वीकारावा.

सही/-xxx
**शेखर सिंह**
**जिल्हाधिकारी सातारा**

**प्रति**

सर्व संबंधित.

**प्रत** :- शाखा प्रमुख, ---------------------------------------------------

**प्रत** :- उपविभागीय अधिकारी, उपविभाग सातारा / कोरेगांव / कराड / पाटण / वाई / फलटण / माण-खटाव यांना माहितीसाठी व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी.

**प्रत** :- तहसिलदार, सातारा / जावळी / कोरेगांव / कराड / पाटण / वाई / महाबळेश्वर / खंडाळा / फलटण / खटाव / माण यांचेकडे पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी.

प्रत :- मा.विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, विधानभवन पुणे-१

**निवासी उपजिल्हाधिकारी,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा**